## Training Programme on Vibration Measurement, Analysis & Diagnosis of Machine Faults



As per the directives of Executive Director (O&M), the Training Programme on Vibration Measurement, Analysis & Diagnosis of Machine Faults was started in the Office of the General Manager, T.I.&C, Nagpur from Jan.08 till July 08.During the period Twenty Four Engineers from various Power Stations participated & trained in the field. The Training Programme was started with the following objectives.

1) To get the participants acquainted with basic of vibrations.

2) To expertise at least 2-3 engineers from each Power Station in the field of vibration to handle the situation in the concerned Power Station.

3) To associate the staff deputed from the Office of the General Manager, T.I.&C, Nagpur in vibration analysis of the machines during the staff visit to the respective Power Station.

In continuation, with the above Second Phase Two days Training Programme on Vibration Measurement, Analysis & Diagnosis of Machine Faults was again started from 25.03.09 to 26.03.09. Seven Engineers from various Power Stations participated in the second phase during which basic fundamental concepts about vibration were shared. The faculties from the O/o the General Manager, TI&C Dy. Ex.Engr. Mr. S.M. Dawande, Mr. S.S.Indapawar, Dr.B.T.Shinde & Asstt. Engr. Mr. S.N. Gotmare shared their thoughts with the participants.

The Two days Training Programme was presided over by Shri Shrikant Rekhade, Supdt. Engineer (CPU), Nagpur who has also handed over the Training Completion Certificates to the individual participant. He also requested the all Power Stations Incharge to allow the engineers from Power Stations to participate in the training programme. Mrs. Asha Pawar, Ex. Engineer, Task Force appreciated the faculties for their contribution in the field of vibration. The programme was concluded by Shri S.S.Indapawar, Dy.E.E.,Task Force who also proposed vote of thanks.

The training Program will be conducted every month & will last till the participants get well acquainted with the vibration. On job training will also be provided to the participants to clear their doubts.

## कॉर्पोरेट जगतात मनुष्यबळ हाच विकासाचा एकमेव केंद्र बिंदू - सगीर खान



श्री.सगीर खान यांचा सत्कार करताना श्री.बी.झेड. शिवणकर. सोबत श्री.आनंद कोंत.

महानिर्मितीच्या विदर्भ विभागीय मानव संसाधन विभागाच्या संयुक्त विद्यमाने कोराडी वीज केंद्राच्या सभागृहात फेब्रुवारी, २००९ मध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमात तत्कालीन मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री.सगीर खान यांना सेवानिवृत्तीनिमित्ताने भावपूर्ण निरोप देण्यात आला. याप्रसंगी मंचावर अध्यक्षस्थानी सर्वश्री.भीमराव शिवणकर, अधीक्षक अभियंता, आनंद कोंत, आस्थापना अधिकारी, श्री.ज्ञानेश्वर दामोदर, कार्यकारी अभियंता प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रारंभी प्रास्ताविकातून नंदकिशोर पांडे, उप आस्थापना अधिकारी यांनी निरोपमूर्ती सगीर खान यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला आणि हा निरोप समारंभ नसून 'गुणगौरव समारंभ' असल्याचे गौरवोद्गार काढले. यानंतर सर्वश्री.आनंद कोंत, एस.एम. भागवत, ज्ञानेश्वर दामोदर, सुरेश बैरागी, मानेकर, दादाराव परिपगार, सुभाष चिमूरकर यांची समयोचित भाषणे झाली त्यात विशेषत: श्री.सगीर खान यांनी स्टाफ सेट अप, एच.आर. प्लॅन पुस्तकरूपात तयार करण्यात बजावलेल्या भूमिकेचा विशेषत्वाने उल्लेख करण्यात आला. सगीर खान हे सेवाविनिमयाबाबतचे चालते-बोलते पुस्तक असल्याचा त्यांचा नावलौकिक असल्याची स्तुतीसुमने वक्त्यांनी काढली. प्रशासकीय कामात कुठलीही गंभीर समस्या आली तर श्री.सगीर खान हे मार्गदर्शन करीत होते ते भविष्यातही आम्हाला सहकार्य करतील अशी अपेक्षा अध्यक्षीय भाषणातून श्री.भीमराव शिवणकर यांनी व्यक्त केली.

निरोपाला उत्तर देताना श्री.सगीर खान म्हणाले की, मनुष्यबळ हीच खरी कंपनीची संपत्ती असल्याने कंपनीच्या विकास प्रक्रियेत प्रत्येक कर्मचाऱ्याचा मोलाचा वाटा असतो. निरोपाप्रसंगी माझी जेवढी तारीफ करण्यात आली तेवढा मी मोठा नाही. माझे नांव 'सगीर' आहे आणि सगीर म्हणजे छोटा. ३९ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेत विविध महत्त्वपूर्ण पदांवर काम करण्याची मला संधी मिळाली आणि त्यातून भरपूर शिकायला मिळाले. प्रत्येकाने शिकण्याची जिद्द कायम ठेवावी, शिक्षणामुळेच आपल्याला भरपूर संधी प्राप्त होत असतात, संधीचे सोने करायला शिका. तुमचे भविष्य निश्चित उज्जवल होईल असे त्यांनी प्रतिपादन केले. निरोप समारंभाचे सूत्रसंचालन श्री.अण्णा बागडे यांनी तर खास वैदर्भीय शैलीत श्री.यशवंत मोहिते यांनी उपस्थितांचे आभार मानले.

निरोप समारंभाला सर्वश्री.पांडे, शरद पंचभाई, श्रीकृष्ण वायदंडे, डांगरे, तसेच कोराडी, खापरखेडा, नागपूर येथील मानव संसाधन विभागातील पुरूष आणि महिला अधिकारी-कर्मचारी संख्येने उपस्थित होते.

### भुसावळ औ.वि.केंद्राच्या संकेतस्थळाचे उद्घाटन समारंभ

दिनांक ०९ एप्रिल, २००९ रोजी हनुमान जयंतीच्या शुभ मुहूर्तावर भुसावळ औ.वि.केंद्राचे संकेतस्थळ http://www.bhusawaltps.in चे उद्घाटन माननीय श्री.व्ही.एस. पाटील मुख्य महाव्यवस्थापक, भु.औ.वि. केंद्र, दीपनगर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

या संकेतस्थळावर वीज केंद्राविषयी संक्षिप्त माहिती तसेच निविदा सुचना उपलब्ध आहेत. वरील कार्यक्रमास श्री.संजय गट्टेवार महाव्यवस्थापक, सर्व अधीक्षक अभियंते, विभागप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.